**सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील**
**रोजगार हमी योजनेअंतर्गत फलोत्पादन**
**कार्यक्रमासाठी सर्वसाधारण लाभार्थ्यांकरिता**
**पतमर्यादा मंजूरीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो),**
शासन निर्णय क्रमांक - फळबाग -२०१८/प्र.क्र. ७ /रोहयो-५.
नवीन प्रशासकीय इमारत, १६ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :-२६ फेब्रुवारी, २०१८.

**वाचा :-**

१) कृषि व पशुसंवर्धन ,दुग्ध व्यवसाय विकास, व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक-फलायो-२०११/ प्र.क्र.६५/ ९-अे, दि. २०.०७.२०११
२) शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक- योजना २०१३ /प्र.क्र.६९/ रोहयो-५, दि. २६.८.२०१३
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि. १७.४.२०१५.
४) नियोजन विभागाचे शासन निर्णय क्रमांक - फळबाग -२०१५/प्र.क्र. ६७/रोहयो-५, दि. १३.१२.२०१६.
५) जिल्हाधिकारी, लातूर यांचे पत्र क्र. २०१७/रोहयो/कक्ष-४/१७/३२१४, दि.००.१२.२०१७
६) जिहाधिकारी, उस्मानाबाद यांचे पत्र क्र.२००९-११/मग्रारोहयो /कक्ष-६ /फळबाग /सिआर-६, दि.निरंक
७) जिल्हाधिकारी, जळगाव यांचे पत्र क्र. रोहयो/सलेअ/कावि/फळबाग/१४/२०१८ दि.०८.०२.२०१८
८) जिल्हाधिकारी, नाशिक यांचे पत्र क्र. कक्ष-११/रोहयो-४/फलो/२०१-१८/५३, दि. १२.०२.२०१८
९) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, रायगड यांचे पत्र क्र. जिअकृअ/कृषि-१३/रोहयो/अनुदान मागणी/५५०/२०१८ दि.०५.०२.२०१८

**प्रस्तावना :-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमासाठी इतर/ सर्वसाधारण लाभार्थ्यासाठी सन २०१७-१८ वर्षात लातूर, उस्मानाबाद, जळगाव, नाशिक, रायगड या जिल्हयांकडून पतमर्यादा मंजुरीचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यानुषंगाने निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यामुळे शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय :-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत फलोत्पादन कार्यक्रमासाठी या शासन निर्णयान्वये लातूर, उस्मानाबाद, जळगाव, नाशिक, व रायगड या ०५ जिल्ह्यांना खालीलप्रमाणे निधी वितरीत करण्यात येत आहे:-



Scanned by CamScanner

| अ.क्र. | जिल्हा | निधी मागणी (रू.लक्ष) | मंजुर करावयाचा निधी (रू.लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | लातूर | ३७.१० | ३७.१० |
| २ | उस्मानाबाद | ३६.०७ | ३६.०७ |
| ३ | जळगाव | ५७.२४ | ५७.२४ |
| ४ | नाशिक | ८७.४९ | ८७.४९ |
| ५ | रायगड | २२.३१ | २२.३१ |
| **एकुण** | | **२४०.२१** | **२४०.२१** |

**सदर निधी मंजूर करण्यास खालील अटींस अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे :-**

- रोजगार हमी योजनेअंतर्गत फलोत्पादन कार्यक्रमासाठी दिनांक १९.३.२०१६ व दिनांक १३/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये यापूर्वी खालील जिल्ह्यांना वितरीत केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित जिल्हाधिकारी व अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने काढण्यात यावीत व निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे (U.C.) महालेखापाल कार्यालयास समक्ष जावून सादर करण्यात येतील.
- **सदरचा निधी हा संबंधित जिल्ह्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांनुसार वितरित करण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात रकमेचे अतिप्रदान झाल्यास त्याची वसुली करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व अधीक्षक कृषी अधिकारी यांची राहील.**
- महालेखापाल कार्यालयाच्या यादीमधून प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र कमी केल्याबाबतचे निपटारा प्रमाणपत्र (Clearance Certificate) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शासनास त्वरित सादर करण्यात येईल व त्याची प्रत संचालक (फलोत्पादन), पुणे यांना पाठविण्यात येईल. संचालक (फलोत्पादन), पुणे हे त्यावर संनियंत्रण ठेवतील.
- सदर निधी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वितरीत करून त्याची एक प्रत जिल्हाधिकारी यांनी साक्षांकित करून संचालक (फलोत्पादन), पुणे यांच्याकडे पाठविण्यात येईल.
- महालेखापालांच्या प्रलंबित यादीमधून ती कमी करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
- खर्च ताळमेळ (A.G. Reconciliation) बाबत देखील कार्यवाही करण्यात येईल.
- त्याची एक प्रत शासनास व एक प्रत संचालक (फलोत्पादन), पुणे यांना पाठविण्यात यावी व संचालक (फलोत्पादन), पुणे हे त्यांचे संनियंत्रण करुन महालेखापालांकडून याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत योग्य ती उपायोजना करतील.
- यापुर्वी शासनाने वारंवार सुचना देवुनही प्रलंबीत उपयोगीता प्रमाणपत्रे शासनास प्राप्त झालेली नाहीत. सबब, सदर प्रलंबीत उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल कार्यालयास सादर करून त्यांच्या प्रती शासनास तात्काळ सादर कराव्यात ही विनंती.

२. सदर पतमर्यादेचे वाटप रोजगार हमी योजनेच्या संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांकडे करण्याबाबतची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी तात्काळ करावी. तथापि, यापूर्वी संबंधित जिल्ह्यांना मंजूर केलेली परंतू खर्च न झालेली पतमर्यादा शासन आदेशानुसार तात्काळ शासकीय



Scanned by CamScanner

कोषगारात विहित कार्यपध्दतीनुसार जमा करण्यात आल्याची खातरजमा करण्यात यावी. पतमर्यादेचे वाटप अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारा करण्यात येत आहे.

३. ज्या जिल्ह्यामधून उपयोगिता प्रमाणपत्राबाबत कार्यवाही प्रलंबित आहे, त्यांची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने करुन महालेखापाल कार्यालयाच्या यादीमधून प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र कमी केल्याबाबतचे निपटारा प्रमाणपत्र (Clearance Certificate) प्राप्त करुन घ्यावे. त्याची एक प्रत शासनास व एक प्रत संचालक (फलोत्पादन), पुणे यांचेकडे सादर करण्यात यावी. संचालक (फलोत्पादन), पुणे हे त्यांचे संनियंत्रण करुन महालेखापालांकडून याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत योग्य ती उपायोजना करतील.

४. वित्त विभागाच्या दिनांक १७.०४.२०१५ च्या परिपत्रकान्वये अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी प्रशासकीय विभागांनी वित्त विभागाची मान्यता घेऊन निर्गमित केलेल्या दिनांक २५.४.२०१३ च्या शासन परिपत्रकाच्या अधीन राहून नियोजन विभाग (रोहयो) यांनी दिनांक २६.८.२०१३ रोजी " ३१ वेतनेत्तर सहायक अनुदाने" अंतर्गत निधी वितरणाचे प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्याची अट शिथील करण्याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्यांत आले आहे. (नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९६/का.१४३४, दि. १५.७.२०१३ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३३८/१३/व्यय-८, दिनांक २.८.२०१३ )

५. वरील प्रमाणे रु. २४०.२१ लक्ष इतका निधी नियोजन विभाग, **"मागणी क्रमांक ओ-३, २५०५ ग्रामीण रोजगार, ६०- इतर कार्यक्रम, ००१- रोजगार हमी योजना, पंचवार्षिक योजनाअंतर्गत योजना (०१) रोजगार हमी योजना (०१), (०१) (०३) फलोत्पादन कार्यक्रम, (२५०५ ०७७३), ३१- सहाय्यक अनुदाने"** या उपलेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील मंजूर तरतूदीतून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(डॉ. प्रमोद शिंदे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. जिल्हाधिकारी, लातूर, उस्मानाबाद, जळगाव, नाशिक, रायगड.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर, उस्मानाबाद, जळगाव, नाशिक, रायगड.
३. संचालक, (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे.
४. जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, लातूर, उस्मानाबाद, जळगाव, नाशिक, रायगड.
५. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता-१/२), मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापरिक्षा-१/२), मुंबई/नागपूर.
७. विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, औरंगाबाद,
८. जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर, उस्मानाबाद, जळगाव, नाशिक, रायगड.
९. सहायक संचालक, (लेखा) कार्यासन रोहयो-७.
१०. निवडनस्ती, रोहयो-५.

Scanned by CamScanner